N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस स्टेशन, वरोरा जिल्हा - चंद्रपूर

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** वरोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 01:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 03/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2025
**Time From (वेळेपासून):** 19:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/02/2025 **Time (वेळ):** 15:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 01:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रत्नमाला चौक ते आनंदव चौक ,दरम्यान असलेल्या नंदनवण , प्रवेशद्वारा जवळ वरोरा , वरोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बुधराज रामगोपाल केवट

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हनुमान मंदीर जवळ, ,माजरी कॉलरी ,भद्रावती ,वरोरा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हनुमान मंदीर जवळ, ,माजरी कॉलरी ,भद्रावती ,वरोरा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9595886549

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सरजिव अजाबराव बोरकर | | | 1. कषी सहायक, तालुका कषी अधिकारी,कार्यालय भद्रावती, भद्रावती ,भद्रावती,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लागलीच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | vivo कंपणीचा जूना वापरता मोबाईल | 15,000.00 |
| 2 | वाहने आणि इतर | मोटर साइकल | जुनी वापरती बजाज डिसकव्हर MH 37 F 6351 | 50,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 2 चलनी नोटा | 1,000.00 |
| 4 | इतर | यंत्र–उपकरण/उपसाधन | सॅनडिक्स कंपणीची 32 GB 3 मेमरी कार्ड | 0.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | क्रिम कलरचा शर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

66,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
दिनांक 04/02/2025

मी बुधराज रामगोपाल केवट, वय 38 वर्ष, धंदा-शेती, रा. वार्ड क्र. 1, हनुमान मंदीर जवळ, माजरी कॉलरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. काल दिनांक 03/02/2025 रोजी ला.प्र.वि.चंद्रपूर येथे जावुन लाच रक्कमेच्या मागणी बाबत तक्रार केलेली आहे ती तक्रार खालील प्रमाणे -

सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वरील ठिकाणी आपले परीवारासह राहत असुन शेतीचे काम करतो. माझी मौजा नंदोरी बुज. ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथील सर्व्हे नं. 585/5ब मध्ये 2.42 हे.आर. चौ.मी. शेती आहे. सदर शेतजमीन मी 2006 पासुन वाहत आहे.

मी सप्टेंबर 2024 मध्ये महा डिबीटी अंतर्गत कृषी विभागामार्फत शेतमालावर किटकनाशक फवारणीकरीता बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) योजने अंतर्गत मोफत बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) मिळणेकरीता ऑनलाईन अर्ज केलेला होता. सदर केलेल्या अर्जानुसार सप्टेंबर/2024 कृषी विभाग भद्रावती यांचे यादीमध्ये माझे नांव येवुन दि. 07 ऑक्टोंबर 2024 रोजी मौजा चंदनखेडा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) वाटप होणार होते. परंतु मी बाहेरगावी असल्याने माझे मौजा चंदनखेडा येथे बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) घेण्याकरीता जाणे झाले नाही. त्यामुळे मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती येथील कृषी सहायक, श्री. बोरकर साहेब यांना फोन करून माझे वडील यांना बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) घेण्याकरीता पाठवु कां असे विचारले असता त्यांनी ''आज नका पाठवू, आता वाटप बंद होत आहे. एक दोन दिवसांनी बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) घेण्याकरीता या'' असे म्हणाले. त्यानंतर मी दोन तिन दिवसानंतर माझे मोबाईल क्र. 9595886549 यावरून कृषी सहायक, श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 यावर फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु ते उचलत नव्हते. त्यावरुन मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती येथे जावून कृषी सहायक, श्री. बोरकर साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेवून बॅटरी स्प्रे पंप फवारणी पंप) बाबत विचारणा केली, तेव्हा त्यांनी चंदनखेडा येथे बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) ठेवलेले आहेत, आता माझेकडे वेळ नाही आहे तेथे जाण्यासाठी, चंदनखेडा येथे गेलो की मी तुम्हाला फोन करून कळवितो तेव्हा तुम्ही या'' असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना वारंवार फोन करून विचारणा केली असता त्यांनी मी चंदनखेडा गेलो की तुम्हाला फोन करतो' असे म्हणुन आजपर्यंत बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) देण्याकरीता टाळाटाळ करीत

होते.

त्यानंतर आज दिनांक 03/02/2025 रोजी वणी-राजुर येथे माझे नातेवाईकाकडे प्रकृतीसंबधी भेट घेणेकरीता गावाला गेलो होतो. तेव्हा माझे मोबाईल क्रमांक. 9595886549 यावर कृषी सहायक,श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 यावरुन फोन करुन दुपारी अंदाजे 01/00 वा. दरम्यान फोन करुन त्यांनी मला ''स्प्रे पंप तुला आता पाहिजे असेल तर मला 1000/- रू. दयावे लागेल, तरच मी तुला स्प्रे पंप देतो.'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेब माझेकडे आता पैसे नाही आहे. मी वणी-राजुर येथे नातेवाईकाचे प्रकृती बरी नसल्याने गावी आलो आहे. माझे आता येणे होणार नाही. असे म्हणालो तेव्हा त्यांनी ठिक आहे असे म्हणुन फोन ठेवून दिला. त्यानंतर परत संध्याकाळला अंदाजे 05/15 वा. दरम्यान कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचा मला फोन आला व म्हणाले की, ''तू आला का गावावरुन असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना सर आज माझे वरोरा येथे येणे होणार नाही. मी, उद्याला येणार आहे. तुम्ही म्हणाल त्यावेळेस येतो असे मी फोनवर त्यांना म्हणालो. तेव्हा त्यांनी ठिक आहे मी, तुला उद्याला फोन करतो तेव्हा पैसे घेवून या'' असे म्हणाले. त्यावरुन मी नाईलाजास्तव होकार देवून फोन ठेवून दिला.

मला श्री. बोरकर, कृषी सहायक, भद्रावती यांना 1000/- रूपये लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी दिनांक 03/02/2025 रोजी सायंकाळी 07:00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे येवुन सदरची तक्रार तुम्हाला देत आहे. तरी महा डिबीटी अंतर्गत कृषी विभागामार्फत शेतमालावर किटकनाशक फवारणीकरीता बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) योजने अंतर्गत बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) मिळणेकरीता 1000/- रुपये लाचेची मागणी करणारे श्री. बोरकर, कृषी सहायक, भद्रावती यांचेविरुध्द कार्यवाही होण्यास विनंती आहे.

माझा श्री. बोरकर, कृषी सहायक, भद्रावती यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारीचा व्यवहार नाही. सदर कार्यवाही करीता आवश्यक असलेली 1000/- रुपये हे माझे वैयक्तीक बचतीतुन जमा करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्या करीता देत आहे. करीता मला लाच मागणारे श्री. बोरकर,कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती यांचेवर कार्यवाही होणेस विनंती आहे.

वरीलप्रमाणे तक्रार मी पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांचेकडे दिल्यानंतर त्यांनी सांगीतले की, आमचे कार्यालयात आधीच गोपनीय कामाकरीता दोन शासकीय पंच उपस्थित असल्याचे सांगुन सदर पंच हे मा. प्रादेशीक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ चंद्रपूर या कार्यालयातील आहे. दोन्ही पंचाना माझे समोर बोलावून पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे नाव गाव विचारुन माझी त्यांचेशी व स्टॉफची ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पो.कॉ. वैभव गाडगे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष मी दिलेल्या तक्रार अर्जावरुन गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांची लाच मागणीची पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले. सदर पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 1000/- रू. नगदी (500/- दराच्या 2 चलनी नोटा) घेवुन त्या नोटांचे क्रमांक नोंदवुन पोलीस निरीक्षक जितेंद्र गुरनुले साहेब यांचेकडे जमा करण्यात आले.

त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तदनंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जितेंद्र गुरनुले साहेब यांना सांगीतले की, गै.अ. श्री. बोरकर कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती यांनी मला मंगळवार दिनांक 04/02/2025 रोजी वरोरा येथे मी फोन करेल त्यावेळेस येण्याचे सांगीतले असल्याने दिनांक

03/02/2025 रोजीची कार्यवाही स्थगीत ठेवून पूढील कार्यवाही दिनांक 04/02/2025 रोजी वरोरा येथे करण्यात यावी असे सांगीतले. त्यांवरुन श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे स्टॉफ व दोन्ही पंचाना पुढील कार्यवाही ही दिनांक 04/2/2025 रोजी करण्यात येणार असल्याचे सांगुन सर्वांना सदर कार्यवाहीबाबत गोपनीयता बाळगण्याच्या सुचना दिल्या. त्यांनतर श्री. गुरनुले साहेब यांनी लाचरक्कमेचा असलेला लिफाफा त्यांचे ताब्यात ठेवला. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).

त्यांनतर दिनांक 04/02/2025 रोजी मी सकाळी घरी हजर असतांना गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचा मला सकाळी 09/11 वा. फोन आला व त्यांनी मला म्हटले की, तुम्ही गावावरुन आले असल्यास मला वरोरा येथे येवून भेटा 11-12 वाजता चे दरम्यान होंडा शो रुम जवळ येवून मला फोन करा असे सांगीतले. असता मी त्यांना आल्यावर फोन करतो असे सांगीतले. त्यांनतर मी लगेच श्री. गुरनुले साहेब यांना गैरअर्जदार हे मला वरोरा येथे भेटण्यास बोलावीले असल्याचे सांगीतले. त्यावर गुरनुले साहेब यांनी मला तुम्ही वरोरा शहरा जवळील महाकाली नगरी जवळ आपले मोटार सायकलने 11/00 वा. पावेतो येवून थांबुन रहा. असे सांगीतले असता मी ठरल्याप्रमाणे तेथे हजर असतांना पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब हे त्यांचे स्टॉफ व दोन पंचासह 11.00 वा दरम्यान मला वरोरा शहरा जवळील महाकाली नगरी जवळ नियोजीत ठिकाणी कारवाईस लागणा-या संपूर्ण साहित्य घेवून शासकीय वाहनाने भेटले. मी माझी हीरो कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 एच डब्ल्यु 2684 ही घेवून थांबलो होतो. त्यांनतर पोलीस निरीक्षक गुरनुले साहेब यांचे सुचनेनुसार सर्व सापळा कर्मचारी, दोन पंच शासकीय वाहनातुन उतरले. त्यांनतर पोलीस निरीक्षक गुरनुले साहेब यांनी सर्वांना माझ्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावुन सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक गुरनुले सांहेब यांनी आपण गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणार असल्याचे सांगीतले. मला व पंच क्र. 1 यांना पडताळणीबाबत सुचना दिल्या. श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ. वैभव गाडगे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने पोकॉ. वैभव गाडगे यांनी माझे गळयात छाती भागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर मी आणलेली हीरो कंपनीची मोटार सायकल वाहन क्रमांक एम एच 34 एच डब्ल्यु 2684 या दुचाकी वाहनाने मी व पंच क्र. 1 सह वरोरा येथील होंडा शो रुम जवळ जावुन गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 वर माझे मोबाईल क्रमांक 9595886549 वरुन फोन करुन मोबाईल स्पीकर मोडवर ठेवून ''होंडा शो रुम जवळ आलो'' असल्याचे सांगीतले असता गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी मला ''तीथेच थांबा मी थोडया वेळात येतो'' असे सांगीतले. त्यांनतर काही वेळातच गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 यांचा माझे मोबाईल क्रमांक 9595886549 वर फोन आला असता मी माझा मोबाईल स्पीकर मोडवर ठेवून म्हणालो की, आप कहा हो असे म्हणुन विचारले असता मी त्यांना होंडा शोरुम के पास हु असे सांगीतले असता वो रोड से सीधा आनंदवन चौक के तरफ आओ मै रस्ते पे खडा हु असे सांगीतले असता मी आपले मोटार सायकले पंचासह आनंदवन चौकाकडे जात असतांना नंदनवन प्रवेशद्वारा जवळ गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब हे थांबुन दिसल्याने मी त्यांचेजवळ आपले मोटार सायकल थांबवुन बोललो असता पडताळणी दरम्यान पंचासमक्ष गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी ''देना, उस दिन बोला था ना मैने असे म्हणाले त्यावर मी ''हा उस दिन बोले थे, हजार बहोत जादा होता ना, हजार बहोत जादा होता ना थोडा कम करदो ना, दवाखांने मे पैसा लग गया बहोत '' असे म्हणालो तेव्हा त्यावर गैरअर्जदार यांनी ''हजार मे कम क्या'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ''आप बोलो,नही तो मै कोई ये नही आप बोलो तो'' असे म्हणालो तेव्हा त्यावर गैरअर्जदार यांनी ''हजार रुपये ठिक थे वो हजार की रक्कम क्या देने को पुरेगा'' असे म्हणुन 1000/रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवील्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यांनतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही नंतरची अंगझडती घेतली.
(उर्वरीत फिर्याद मुळ फिर्याद प्रमाणे) त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री. गुरनुले साहेब यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी महा डिबीटी अंतर्गत कृषी विभागामार्फत शेतमालावर किटकनाशक फवारणीकरीता बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप)

योजनेअंतर्गत बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) मिळणेकरीता 1000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे गुरनुले साहेब व दोन्ही पंचाची खात्री झाली. तसेच गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी मला लाच रक्कम ही गैरअर्जदार यांचेशी लाचमागणी बोलणी झालेले ठिकाणी म्हणजेच रत्नमाला चौक ते आनंदवन चौक दरम्यान असलेल्या नंदणवन प्रवेशद्वारा जवळ लाचरक्कम घेवून येण्याचे सांगीतले असल्याचे पडताळणी कार्यवाहीतील संभाषनावरुन दिसुन येत असल्याने त्यावरून गैरअर्जदार श्री. बोरकर साहेब कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला.अँथ्रॅसिन पावडर लावलेली 1000/रू. लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे शर्टाच्या समोरील बाजुच्या डाव्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी लाच रक्कम मागणी केल्यास शर्टाच्या डाव्या खिशात ठेवलेली रक्कम उजव्या हातानी काढून गैरअर्जदार यांना द्यावी. गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्विकारल्यावर पॅन्टच्या डाव्या खिशातुन डाव्या हाताने रुमाल काढून डाव्या हाताने रुमालीने चेहरा फुसुन डाव्या हातात रुमाल ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी मला सांगीतले की, गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 वर माझे मोबाईल क्रमांक 9595886549 वरुन फोन करुन मोबाईल स्पीकर मोडवर ठेवून नंदणवन प्रवेशद्वारा जवळ आलो असल्याचे सांगावे. व ते आल्यानंतर त्यांचेशी बोलणी करुन त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचरक्कम द्यावी असे सांगण्यात आले. त्यांनतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी सापळा कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ. वैभव गाडगे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाँईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे हीरो कंपनीची मोटार सायकल वाहन क्रमांक एम एच 34 एच डब्ल्यु 2684 नी पंच क्र. 01 यांचेसह गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी सांगीतल्याप्रमाणे नंदणवन प्रवेशद्वारा जवळ जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. मी व पंच क्र. 1 नंदणवन प्रवेशद्वारा जवळ जावुन थांबलो. त्यांनतर गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांचे मोबाईल क्र. 9767200367 वर माझे मोबाईल क्रमांक 9595886549 वरुन फोन करुन मोबाईल फोन स्पिकर मोडवर ठेवुन ''नंदणवन प्रवेशद्वारा जवळ आलो'' असल्याचे सांगीतले. काही वेळानी गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब हे त्यांचे मोटार सायकल नी आले. व गाडीचे खाली उतरुन ते माझेशी बोलु लागले. मला गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी '' लेकीन अभी कैसा करने का'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना ''पैसे लेकर आया मै, दे देंगे तो पंप'' असे म्हणालो तेव्हा गैरअर्जदार यांनी ''ठिक है, चलो दे दो'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' हजार ही देना पडेंगा, कुछ कम नही'' असे म्हणालो तेव्हा गैरअर्जदार यांनी '' नही उतना ही'' असे म्हणाला त्यावेळी मी माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात असलेली अँथ्रॅसिन पावडर लावलेली 1000/- रु. रक्कम उजव्या हातानी काढून दिले असता ती रक्कम गैरअर्जदार कृषी सहायक श्री. बोरकर साहेब यांनी त्यांच्या उजव्या हातात घेतली व सदरची रक्कम त्यानी आपले शर्टाचे समोरील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास माझे पॅन्टच्या डाव्या खिशातुन डाव्या हाताने रुमाल काढून डाव्या हाताने रुमालीने चेहरा फुसुन डाव्या हातात रुमाल ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री. बोरकर, कृषी सहायक,तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली.

तरी श्री. सरजिव अजाबराव बोरकर, वय 36 वर्ष, पद- कृषि सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून मला महा डिबीटी अंतर्गत कृषी विभागामार्फत शेतमालावर किटकनाशक फवारणी करीता बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) योजनेअंतर्गत बॅटरी स्प्रे पंप (फवारणी पंप) मिळणेकरीता 1000/- रुपयाची मागणी करुण 1000/रुपये माझे कडुन लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांच्या विरूद्ध भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियमान्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ajinkya Chandrakant Tambe(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ajinkya Chandrakan
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

1338
स. डा. अमलदार
पोलीस स्टेशन, [illegible]
मपोहवा कुंभार पवार 1338
PS [illegible]

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)